**पोलीस उप-आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड**
**कार्यालय- चिंचवडगाव बस स्टॉप, व्यापारी संकुल, पहिला मजला, चिंचवड पुणे ४११०३३**
**piplanning.pcpc-mh@gov.in**

जाक्र/पोउआ/वाहतुक/नियोजन/५७८५७५/२०२३ पिंपरी-चिंचवड दिनांक- १८/१२/२०२३

## ☆ वाहतुक नियंत्रण अधिसुचना ☆

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी रंगुन येथुन गौतम बुध्दांची मुर्ती आणुन ती देहुरोड बुध्दविहार येथे स्थापना केली होती. सदर घटनेचा ६९ वा वर्धापन दि.२५/१२/२०२२रोजी साजरा करण्यात येणार आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला अधिकार प्राप्त झाला आहे त्याअर्थी मी बापू बांगर, पोलीस उप-आयुक्त, वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**देहूरोड/निगडी वाहतुक विभाग अंतर्गत**

१) जुना मुंबई पुणे हायवे रोडने सेंट्रल चौक देहुरोड ते भक्ती शक्ती जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग - सदर मार्गावरील वाहने सेन्ट्रल चौकातुन उजवीकडे वळुन बेंगलोर हायवेने मुकाई चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.**

२) जुन पुणे मुंबई हायवेने भक्ती शक्ती चौक ते सेंट्रल चौक जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंदी करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग – सदर मार्गावरील वाहने भक्ती शक्ती चौकातुन डावी कडे वळुन हॅंगीग ब्रिज रावेत तसेच मुकाई चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.**

तरी वरील प्रमाणे देहुरोड/निगडी वाहतुक विभाग अंतर्गत दि.२५/१२/२०२३ रोजी ०४.०० ते २४.०० वा पर्यंत वरील मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना (अनुयायी यांची व अत्यावश्यक सेवेतील वाहने वगळुन) प्रवेश बंदी करण्यात येत असून वाहतूक पर्यायी मार्गाने वळविणेकरता तात्पुरते स्वरुपात आदेश (नोटिफिकेशन) निर्गमित करण्यात येत आहे.

18/12/2023.

(बापू बांगर)
पोलीस उप आयुक्त
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी देहूरोड, निगडी वाहतुक विभाग
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, देहुरोड कंन्टोन्मेंट बोर्ड

Scanned with OKEN Scanner